# दिनांक 23/04/2025

**1.** रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/04/2025 रोजी 06:30 वा च्या सुमारास मौजे सावळे गावचे हददीत रसायनी कॉर्नर ते सावळे रोडवर, पनवेल, येथे मयत नामे प्रतिक रविंद्र चव्हाण, वय-19 वर्षे, रा.वावेघर,ता.पनवेल, याने आपले ताब्यातील हिरो कंपनीची एक्सट्रीम मोटारसायकल नं.एम.एच.46 सी.एक्स.8582 ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अतिवेगाने चालवून रस्त्याचे बाजुला असलेल्या झाडाला ठोकर मारुन स्वत:च्या लहान मोठया दुखापती होण्यास तसेच स्वत:चे मरणास कारणीभुत झाला.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.85/2025, बी.एन.एस कलम 106(1),281, 125(अ), 125(ब)सह मोटार वाहन कायदा कलम 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/सचिन चौरे हे करीत आहेत.

**2.** दादर (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/04/2025 रोजी 22:30 वा ते दि. 19/04/2025 रोजी 22:30 वा च्या दरम्यान मौजे रत्नागीरी रेल्वे स्टेशन ते जिते रेल्व स्टेशन येथे महिला फिर्यादी यांचे मोबाईल,पॅन कार्ड, आधार कार्ड डाय्व्हींग लायसेस, ईलेकश्न कार्ड् ,एस बी आय बॅंक चे डेबेट कार्ड, फेडरल बॅंक चे डेबेट कार्ड केजीबी बॅंक चे डेबेट काड दि 18/04/2025 रोजी सकाळी 11.30 वा कासरगोड रेल्वे स्टेश्न राज्य केरळ, येथुन पुण्याला येण्यासाठी एर्नाकुलम पुणे सुपरफास्ट एक्सप्रस गाडी नं 22149 चे बोगी नं 4 चे बर्थ नं 9 वरुन प्रवास करत असताना दि.18/04/2025 रोजी सकाळी 11.30 वा.ते दि.19/04/2025 रोजी रात्री 02.00 वा. च्या सुमारास पहाटे चे सुमारास रत्नागीरी रेल्वे स्टेशन ते जिते रेल्व स्टेशन दरम्यान फिर्यादी हया झोपेत आसल्याचा फायदा घेवुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने लबाडीचे ईरादयाने चोरुन नेले.

याबाबत दादर (सागरी) पोलीस ठाणे गुरनं. 21/2025, भारतीय न्याय संहिता 305 (c) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/भोईर हे करीत आहेत.

**3.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/04/2025 रोजी 13:45 वा च्या सुमारास मौजे खालची खोपोली येथील हायको कॉंर्नर जवळील खोपोली नगरपरिषद स्मशानभुमीचे गेटचे बाहेर, खालापुर येथे एका काळया रंगाचे मोटार सायकलवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे जवळ येवून त्यांचेपैकी मोटार सायकल चालविणा-या अनोळखी इसमाने, मंदीरात पैसे दान करायचे आहेत असे सांगून फिर्यादीस बोलण्यात ठेवून काही समजायचे आतच

फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन काढून त्याचे हातातील पाचशे रूपयांचे नोटीमध्ये फिर्यादी यांचे सोन्याची चैन बांधून ती नोट व चैन एकूण 92,000/- रुपये व किमतीची फिर्यादी यांचे हातातील फुलांचे पिशवीत ठेवल्याचे फिर्यादीस सांगुन फसवणूक करून हातचालाकीने सोन्याची चैन घेवून पळुन गेले.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.110/2025, भारतीय न्याय संहिता कायदा 2023 चे कलम 318(4),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री अभिजित व्हंराबळे हे करीत आहेत.

**4.** दिघी (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/04/2025 रोजी 19:45 वा च्या सुमारास मौजे दिवेआगर येथे साक्षीदार यांचे राहते घरासमोर, श्रीवर्धन येथे आरोपीत क्र 01 ते 08 रा.दिवेआगर नवेनगर ता.श्रीवर्धन यांनी त्यांना ग्रामपंचायत कार्यालय दिवेआगर यांचेकडुन घर पाडण्याच्या आलेल्या नोटीसला जबाबदार साक्षीदार असल्याचा समज झाल्याने तेथे हजर असलेले साक्षीदार यांना शिवीगाळ करून हाताने मारहाण केली त्यामध्ये आरोपीत क्र 01 याने फिर्यादी व साक्षीदार यांच्या अंगावर चप्पल फेकुन मारली तसेच आरोपीत क्र.06 यांनी साक्षीदार हीला लाथाने मारहाण केली व आरोपीत क्र.05 यांने फिर्यादी यांना दगड फेकुन मारला असता तो फिर्यादी यांच्या उजव्या गालाच्या वरच्या बाजुस लागुन उद्येशपुर्वक साधी दुखापत झाली.

याबाबत दिघी (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.23/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 189(2),191(2),190,352,115(2),125,118(1), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री शेख हे करीत आहेत.

**5.** पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक19/04/2025 रोजी 19:45 वा च्या सुमारास मौजे जे.एस.डब्ल्यु सिमेंट प्लॉट इरवाडी पेण ता. पेण येथे कंपनीसमोर मुंबई गोवा मेन हायवे रोडवर आरोपीत चालक हे त्यांचे ताब्यातील सफेद रंगाची कार ही स्वत: चालविवत घेउन मुंबई बाजुकडुन पेण बाजुकडे घेउन असताना मौजे जे.एस.डब्ल्यु सिमेंट प्लॉट इरवाडी पेण ता.पेण येथे कंपनीसमोर मुंबई गोवा मेन हायवे रोडवर आलेवेळी त्यांचे ताब्यातील कार ही अतितवेगाने हयगयीने, बेदरकारपणे रसत्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवून जखमी प्रमोद जनार्दन पाटील रा.तरणखोप,ता.पेण यास ठोकर मारून त्याचे डोक्यास गंभीर दुखापत करून अपघाताची खबर न देता पेण बाजुकडे पळुन गेला.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं. 76/2025 भा.दं.वि.क. 281, 125(A)(B),¨, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184,134 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/संदिप श्रिगावकर हे करीत आहेत.

**6.** म्हसळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 22/04/2025 रोजी 20:15 वा च्या सुमारास मौजे मेंदडी कोंड फाटयाजवळील उतारावर म्हसळा दिघी जाणा-या रोडवर ता.म्हसळा, येथे आरोपीत रा देगांव आदिवासीवाडी, ता.माणगांव याने त्याचे ताब्यातील ॲक्टीवा स्कुटी क्रमांक एम.एच.06. सी.के. 4287 ही दिघी ते म्हसळा रोडने जात असतांना मेंदडी कोंड फाटयाजवळील उतारावर म्हसळा दिघी जाणा-या रोडवर आलेवेळी त्याने त्याचे ताब्यातील ॲक्टीवा स्कुटी क्रमांक एम.एच.06. सी.के. 4287 हि वर ट्रिपलसीट घेवुन भरधाव वेगात हयगयीने निष्काळजीपणे रस्त्याच्या परिस्थीतीचे दुर्लक्ष करुन चालवित घेवुन येवुन रस्त्याच्या बालुला असलेल्या खडडयात पडुन अपघात करुन त्या अपघातात स्वत:चे डोक्यास गंभीर स्वरुपाच्या दुखापती होवुन तसेच फिर्यादी व साक्षीदार यांचे किरकोळ दुखापतीस तसेच ॲक्टीवा स्कुटी नुकसानिस कारणीभुत झाला.

याबाबत म्हसळा पोलीस ठाणे गुरनं. 23/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184,128 (1), भारतीय न्यायसंहिता संहीता 2023 चे कलम 281,125(a),225(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/ देविड पालोदे हे करीत आहेत.

**7.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 21/04/2025 रोजी 15:00 वा च्या सुमारास मौजे आत्करगाव, ता.खालापुर, येथील पॅसिपिक ऑईल ॲन्ड एनर्जी इंडिया, कंपनी ता. खालापुर येथे, शासनाने पेट्रोलीयम सदृश्य ज्वलनशील द्रवपदार्थाचे संपादन, खरेदी व विक्रीच्या विनापरवाना व्यवहारावर निर्बंध घातले असुन, पेट्रोलजन्य द्रव्यपदार्थाची बेकायशीररित्या वाहतुक, अनधिकृतरित्या एकूण अंदाजे किंमत 32,45,200/- रुपये व किमतीची साठवणुकीवर नियंत्रण ठेवण्याकरिता दि. मोटर स्पिरीट ॲड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रिब्युशन ॲड प्रिव्हेंशन ऑफ माल प्रॅक्टीसेस)ऑर्डर 2005अन्वये अटी व नियम घालुन दिलेल्या आहेत. त्यानुसार कंपनीचे मालक आरोपी रा. मुंबई यांनी त्यांच्याच पॅसिफिक ऑईल ॲन्ड एनर्जी इंडिया कंपनीमध्ये बेकायदेशीर पेट्रोलजन्य द्रव्यपदार्थांचा साठा केला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.109/2025जीवनावश्यक वस्तू अधिनियम, 1955, जीवनावश्यक वस्तू अधिनियम, 1955 3,7, 8(2),दि पेट्रोलियम प्रॉडक्ट (मेटनन्स ऑफ प्रॉडक्शन स्टोरेज ॲण्ड सप्लाय) ऑर्डर 1999 कलम 3,4,5,6, व 7, दि. मोटर स्पिरीट ॲड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय , डिस्ट्रिब्युशन ॲड प्रिव्हेंशन ऑफ माल प्रॅक्टीसेस) ऑर्डर 2005 चे कलम 3(1) (2) (3ए) (6) (7), 7, 8, दि. महाराष्ट्र सॉल्वंट रॅफिनेट ॲड स्लॉप (अनज्ञापन) आदेश 2007. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोनि श्री. शितल राउत हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 22.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 307 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 3,27,000/-रुपये इतका दंड आकारला आहे.